


नितीन राऊत
सभापती, स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका


## मा. अध्यक्ष महोदय, व सन्मा. सभागृह,

लोकनेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब व मा. प्रथम महापौर श्री. राजीवजी पाटील साहेब, द्वितीय महापौर श्री. नारायणजी मानकर साहेब यांच्या कुशल नेतृत्वाखाली काम करणेस मला संधी मिळाली यात मी धन्यता मानतो. वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या लोकनियुक्त लोकप्रतिनिधींनी तयार केलेला हा पाचवा व सभापती स्थायी समिती म्हणून माझे कार्यकाळातील पहिला व परिवहन उपक्रमाचा परिवहन समितीने तयार केलेला द्वितीय स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करण्याचा बहुमान मला मिळाला याबद्दल मी त्यांचा व आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. महानगरपालिकेच्या कामकाजासाठी आपले आदरणीय लोकनेते मा. प्रथम महापौर, मा. द्वितीय महापौर, मा.उपमहापौर, भुतपूर्व नगरपरिषदांचे माजी नगराध्यक्ष व इतर सन्मा. पदाधिकाऱ्यांसह दिलेल्या भेटीमध्ये मा. ना. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, विधानपरिषदेचे उपसभापती मा. ना. श्री. वसंतरावजी डावखरे साहेब, मा. खासदार श्री. चिंतामणजी वनगा साहेब, पालकमंत्री मा. ना. श्री. विष्णूजी सावरा साहेब, तत्कालीन मुख्यमंत्री मा.श्री. पृथ्वीराजजी चव्हाण साहेब, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा.श्री. अजीतदादा पवार साहेब, तत्कालीन खासदार मा. श्री. बळीरामजी जाधव साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. निरंजनजी डावखरे साहेब, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आजी माजी आयुक्त तसेच केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे मा. सनदी अधिकारी यांच्या वेळोवेळीच्या सदिच्छा व मार्गदर्शन आपल्या पाठीशी सदैव राहीले आहे. बहुजनांचा विचार करुन बहुजनांच्या हितासाठी असलेला बहुजनांचाच हा अर्थसंकल्प सादर करताना आदरणीय लोकनेते आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. महापौर सौ. प्रविणाताई ठाकूर मॅडम, मा. प्रथम महापौर राजीवजी पाटील साहेब, द्वितीय महापौर मा. नारायणजी मानकर साहेब, मा. उपमहापौर उमेशजी नाईक साहेब, मा. प्रथम उपमहापौर श्री. सगिरजी डांगे साहेब, माजी. उपमहापौर श्री. रुपेशजी जाधव साहेब, मा. सभागृह नेते श्री. फ्रँक डिसोझा साहेब, मा.स्थायी समितीचे प्रथम सभापती मा. श्री. जितेंद्रजी शहा साहेब, मा. स्थायी समितीचे द्वितीय सभापती मा. श्री. अजीवजी पाटील साहेब, माजी स्थायी समिती सभापती मा. श्री. संदेशजी जाधव साहेब यांचे नियमित व

विशेष मार्गदर्शन तसेच सर्व प्रभाग समित्यांचे सभापती सर्व पदाधिकारी यांनी मला वेळोवेळी भेटुन केलेल्या मौलीक सुचना यासर्वांचे प्रतीबिंब या अर्थसंकल्पात उमटले आहे. सर्व सन्मा. गटनेते व सदस्यांकडून तसेच सर्व सन्मा. नागरीकांकडून देखील त्यांचे विचार व अपेक्षा आणि कल्पना जाणून घेण्याचा आम्ही प्रयत्न केला असुन त्याबाबीदेखील या अर्थसंकल्पात विचारात घेतल्या आहेत.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या निर्वाचित सदनाचे हे पाचवे अंदाजपत्रक आपणासमोर सादर करीत असताना मला अतिशय आनंद होत आहे. अर्थसंकल्प म्हणजे निव्वळ आकडयांची जुळवाजुळव नसून उत्पन्न व खर्च यांचे अंदाज घेत असताना विकासाचे संकल्पचित्र आपल्यासमोर उभे राहते. आपणाला या सोबत दिलेल्या सुधारित अर्थसंकल्प सन २०१५-१६ व सन २०१६-१७ चा मुळ अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये सविस्तर आकडेवारी (लेखा जोखा) दिलेला आहे. महानगरपालिकेत भारतीय प्रशासकीय सेवेकडील अधिकारी मा. सतिश लोखंडे यांनी आयुक्त पदाचा पदभार स्विकारल्यानंतर त्यांनी विकासाबाबत वेळोवेळी मा. पदाधिकारी यांचेशी चर्चा केल्यानंतर अर्थसंकल्पीय गोषवारा मा. स्थायी समितीस छापील स्वरुपात सादर केला आहे. त्यावर सर्वंकष विचार करुन मा. स्थायी समितीने शिफारस केलेली आहे. तो या अर्थसंकल्पाबरोबर जोडला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्यावर दृष्टीक्षेप टाकला असता असे निदर्शनास येते की, महानगरपालिका क्षेत्रातील जन्माला येणाऱ्या जीवाची जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या गरजांची आवश्यक ती काळजी महानगरपालिकेने घेतली पाहिजे व त्यासाठी आवश्यक त्या सेवासुविधा निर्माण केल्या पाहिजेत व त्यासाठी वार्षिक अंदाजपत्रकात योग्य त्या तरतुदी केल्या पाहिजेत. यासाठी विचार करुन अंदाजपत्रकात आर्थिक बाबींसाठी पुरेशा तरतुदी केल्या आहेत.

७४ व्या घटना दुरुस्तीनुसार महानगरपालिकेच्या आवश्यक व स्वेच्छाधीन कर्तव्यात वाढ झाली असून शहरातील नागरिकांसाठी सामाजिक व आर्थिक विकासासाठी योजना आखणे, पर्यावरण संरक्षण, नागरी वनीकरण इ. चालना देणे हे महानगरपालिकेचे आवश्यक कर्तव्य ठरविण्यांत आले आहे. महानगरपालिकेस आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार अपंग व्यक्तींसाठी सुविधा देणे आवश्यक असून आपण त्याकामी अपंगांच्या संस्थांना महिला बालकल्याण अनुदानाद्धारे मदत करीत असतो. प्रसुतीगृहे व बाल कल्याण केंद्र स्थापन करणे यासाठी आपण माता व बालसंगोपनासाठी भरीव तरतुद या अर्थसंकल्पात केली आहे. सार्वजनिक सुरक्षा या सदराखाली आपण सी.सी.टी.व्ही लावण्याचा प्रकल्प हाती घेतला असून त्यासाठी आवश्यक ती तरतुद केली आहे.

वसई-विरार पट्टयात पाण्याचे दुर्भिक्ष होते, हे आपणास ठाऊक आहेच. पण लोकनेते व आपले आमदार मा.श्री. हितेंद्रजी ठाकूर यांनी द्रष्टेपणाने विविध प्रकल्पाद्वारे या शहरास पाणी मिळविले आहे. त्यासाठी मा. आमदार क्षितीजजी ठाकूर, मा. आमदार विलासजी तरे व माजी खासदार श्री. बळीरामजी जाधव यांचेही सहकार्य झाले आहे. सध्या असलेले पाणी व लवकरच येणारे नवीन योजनेचे पाणी वितरित करण्यासाठी जलकुंभ व वितरण व्यवस्था करण्याचे काम अर्थसंकल्पात घेण्यांत आले आहे. वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी अनेक योजना हाती घेण्यांत आल्या असून त्याचा अंतर्भाव अमृत योजनेत आहे. त्यामधून करोडो रुपयांची कामे करण्यांत येणार आहेत. अर्थसंकल्पात त्यासाठी बाबवार तरतुदी केल्या आहेत.

मा. स्थायी समितीने मा. आयुक्तांनी दिलेले खर्च व उत्पन्नाचे अंदाज यांचा विचार करुन अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यावर मा. महासभेने विचार करावा, ही विनंती.

विकास निधीअंतर्गत नाटयगृह, सभागृह बांधकाम व इतर विकास कामे करण्यासाठी ₹ ९१ कोटीं ६९ लाखांची तरतुद करण्यांत आली असून त्यामध्ये मौजे मालोंडे सर्वे क्र. ४१ - अ मधील प्रस्तावित नाटयगृहासाठी रु. ९ कोटी ११ लाखांची तरतुद करण्यांत आली आहे.

या वर्षी करावयाची विशेष कामे :- महानगरपालिका क्षेत्रात रेल्वेस्थानकनजिक पार्किंग लॉट विकसित करणे, विद्यार्थी विकास केंद्र विरार (पूर्व) चंदनसार येथे बहुउद्देशिय इमारत, नालासोपारा येथील मजेठिया नाटयगृह, गोकुळ टाऊनशीपमधील सांस्कृतिक भवन बांधकाम, रोरो फेरी सेवा, नवघर येथील वातानुकूलीन व्यायाम शाळा, सर्वे क्र. ६९३ येथे ड्रामा थिएटर अशी कामे सुचविली आहेत. ही सर्व कामे स्वनिधीतून करावीत, असे ठरविण्यांत आले आहे. या सर्वांसाठी मिळून ₹ ६७ कोटी १० लाखांची तरतुद करण्यांत आली आहे.

प्रशासकीय इमारत बांधकाम सन २०१६-१७ साठी ₹ २० कोटी, शहराअंतर्गत उड्डाणपूल व वर्दळीच्या चौकात ओव्हर ब्रीज बांधकाम (उदा.माणिकपूर चौक, पंचवटी चौक) रॅम्प ब्रीज बांधणे यासाठी ₹ १२ कोटींची तरतुद करण्यांत आली आहे. रस्ते बांधकाम सदरामध्ये प्राथमिक ₹ १६६ कोटीं ७२ लक्षची तरतुद ठेवण्यांत आली असून म्हाडा मैदान ते नालासोपारा पेट्रोलपंप ३० मीटर रुंद रस्ता विकसित करणेसाठी ₹ २५ कोटी, मुख्य शहराकडे येणारे सी.सी. रोडसाठी ₹ १०० कोटीं व नालासोपारा लिंक रोडसाठी ₹ ४१ कोटी ७२ लाखांची तरतुद करण्यांत आली आहे. मा. महापौर निवास व मा. आयुक्त निवास बांधकामासाठी प्रत्येकी ₹ ५ कोटींची तरतुद करण्यांत आली असून त्यामध्ये सन २०१६-१७ सालात बांधकाम सुरु करण्याचा मनोदय आहे.

वालीव येथील हितेंद्र आप्पा मैदान विकसित करणे तसेच जीवदानी मैदान विरार येथे जिमखाना इमारत व इनडोअर ॲकॅडमीसाठी हॉल विकसित करणे, यासाठी १० कोटींची तरतुद ठेवण्यांत आली आहे.

रस्ते दुरुस्ती अंतर्गत ₹ ३० कोटींची तरतुद ठेवण्यांत आली आहे.

फूटपाथ दुरुस्ती, पेंटींगसाठी ₹ ३० कोटीची तरतुद ठेवण्यांत आली आहे.

विकास निधी अंतर्गत रुग्णालय बांधकाम ₹ १३ कोटीं यामध्ये नागरी आरोग्य केंद्र विकास सुधारणा, बोळींज येथील नारिंगी सर्वोदय वसाहत, सातिवली, जुचंद्र येथे मॅटर्निटी होम यासाठी तरतुद करण्यांत आली आहे.

आदिवासी विद्यार्थी वसतीगृह यासाठी ₹ १० कोटींची तरतुद करण्यांत आली आहे.

राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना अनुदानासह महानगरपालिका अंशदानातून तलाव सुशोभिकरण करणे या अंतर्गत निर्मळ येथील विमल तलाव, चिखल डोंगरी तलाव, धानीव तलाव, चोबारे तलाव, गिरीज तलाव, वाकणपाडा तलाव, बिलालपाडा तलाव, तामतलाव विकास, तामतलाव येथे तरणतलाव व पापडी तलाव विकसित करण्यासाठी ₹ ५० कोटींची तरतुद करण्यांत आली आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालयासाठी ₹ २३ कोटी १३ लक्ष ८२ हजार तरतुद ठेवण्यांत आली आहे.

शवविच्छेदन शवागृह व्यवस्थेसाठी २ कोटींची तरतुद करण्यांत आली आहे.

विकास निधी अंतर्गत मंजूर विकास आराखडयातील जागा आरक्षित करण्यासाठी ₹ १० कोटींची तरतुद ठेवण्यांत आली आहे.

पाणी पुरवठा कर्ज व अनुदान निधीतील कामांसाठी तरतुद ठेवण्यांत आल्यानंतर अमृत योजनेअंतर्गत शहरांमधील पाणी पुरवठा योजनेसाठी ₹ १३५ कोटींची तरतुद ठेवण्यांत आली असून यामध्ये ग्रामीण व शहरी वितरण व्यवस्था अंतर्भूत आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठा वितरण व्यवस्था बळकट करणेकरीता केंद्र शासनाच्या अमृत अभियानांअंतर्गत ₹ १३० कोटी व सोलर एनर्जी करीता ₹ ५.७५ कोटी मंजुर करण्यांत आलेले आहे. सदर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी नव्याने २२ उंच जलकुंभ बांधण्याचे प्रस्तावित असून त्यांची एकुण साठवण क्षमता ४० द.ल.ली. आहे. पाणी वितरणाकरीता पालिका क्षेत्रात

एकुण २९० कि.मी. लांबीची वितरण व्यवस्था नव्याने अंथरण्यांत येत आहे. मुख्यत्वे खालील क्षेत्रात वितरण वाहिन्या अंथरणे प्रस्तावित आहे.

| | | |
|---|---|---|
| १. विवा जांगड | १२. परेरानगर | २३. सोपारा गांव |
| २. कारगील नगर | १३. नर्सरी बाग | २४. नवीन श्रीप्रस्थ |
| ३. सहकार नगर | १४. कोळीवाडा | २५. मोरेगांव |
| ४. दिवेकर हॉस्पिटल | १५. गोखिवरे | २६.संतोषभुवन |
| ५. गोकुळ टाऊन शीप, बोळींज | १६. वालीव | २७ वलईपाडा |
| ६. चिखल डोंगरी | १७.सातीवली | २८. गावराईपाडा |
| ७. नारिंगी | १८. कामण | २९. धानीवबाग |
| ८. वसंत नगरी | १९. ससुनवघर | ३०. वाकनपाडा |
| ९. एव्हरशाईन | २०. सेंट्रलपार्क नालासोपारा | ३१. बिलालपाडा |
| १०. तामतलाव | २१.संकेश्वरनगर नालासोपारा | |
| ११.नायगांव | २२. आचोळे तलाव | |

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत विस्तारित सूर्या, १०० दश लक्ष लीटर पाणी पुरवठा योजनेसाठी सन २०१६-१७ साठी ₹ ९१ कोटींची तरतुद करण्यात आली आहे.

विकास निधी अंतर्गत सुसरी, राजीवली, सातिवली, कामण बंधारे बांधून पाणी पुरवठा योजना राबविणे. दहेरजा एन.पी.व्ही. भरणे व तिला नवीन उद्भव तयार करणे. तसेच कवडास बंधारा, सूर्या नदीच्या पात्रात पाच बंधारे बांधणे. या सर्व कामांसाठी यावर्षी ₹ ७५ कोटीची तरतुद आहे.

एकुण पाणीपुरवठा कर्ज व अनुदान निधीतील कामांसाठी ₹ ३०१ कोटी रुपयांचे प्रस्ताव असून अर्थसंकल्पातील योग्य त्या शिर्षासमोर ती तरतुद दर्शविण्यांत आली आहे.

आगामी ५ वर्षे कालावधीचा मालमत्ता कर व पाणीपट्टी आगाऊ भरणाऱ्या करदात्यांना कर रकमेवर १५% दराने प्रोत्साहनपर कर सवलत देणेची तरतुद केली आहे.

विविध बँकांच्या विविध शाखांमध्ये सर्व प्रकारचे कर भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यांत आली आहे.

ऑन लाईन कर भरणा, भ्रमणध्वनीद्वारे करदात्यांना देय व भरणा केलेल्या कराचे संदेश देणेची व्यवस्था उपलब्ध केलेली आहे.

स्वातंत्र्य सैनिक, त्यांची विधवा पत्नी तसेच त्यांचे पुढील पहिल्या पिढीतील एका वारसास त्यांचे राहत्या निवासी सदनिकेस त्यांच्या वेळोवेळीच्या मागणीनुसार मालमत्ता करात १००% सूट आहे.

आजी माजी सैनिक अथवा त्यांचे अवलंबितांस मागणीनुसार मालमत्ता करात ५०% सूट आहे.

शहरांतर्गत अग्नीशमन सेवा नि:शुल्क करण्यांत आली आहे.

शहरांतर्गत रहदारीतील अडथळे दूर करुन ध्वनी प्रदुषण व वायू प्रदुषण टाळणे, डिझेल, पेट्रोल, गॅस इत्यादी उर्जेची बचत करणे, उच्च प्रतीचे रस्ते दळणवळणासाठी उपलब्ध करणेकरीता ₹ २२४२ कोटी गुंतवणुक असलेला ३७ कि.मी. लांबीचा रिंगरोड प्रकल्प साकारणे, ₹ ६०० कोटी खर्चाचे नारिंगी, विरार - सोपारा, सोपारा - वसई, वसई - नायगांव येथील उड्डाण पूल, उन्नत पूल, इन्टर चेंज विकसित करणे, विराट नगर, नारिंगी, अलकापुरी नालासोपारा, राजावली नवघर, वसई इ. मंजुर विकास आराखडयातील विविध अत्यावश्यक ठिकाणी रेल्वे व रस्ते उड्डाणपूल व सर्विस रोड बांधकाम तसेच शहरांतर्गत इतर पूर्व-पश्चिम जोडणारे पादचारी पूल, ₹ ५७९ कोटी १३ लक्ष ५१ हजार खर्चाचे स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज, ही कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करुन घेणेसाठी पाठपुरावा सुरु आहे.

वसई येथील हुतात्मा स्मारक येथे मिनी थिएटर निर्माण करुन पुरातन वास्तू, हुतात्मे व स्वतंत्र सैनिकांची माहिती, वसईचा इतिहास, पर्यटन, फळबागा, फुलबागा, यावर आधारीत माहितीपट तयार करण्याचे प्रस्तावित आहे. प्रमुख चौकांमध्ये वसईची अस्मिता सांगणारे शिल्प साकारण्यात येणार आहेत. पर्यटन विकासाचे क्षेत्र विचारात घेता पर्यटन विकासास चालना देण्यासाठी आकर्षक पध्दतीने जाहिरात करणे, ब्रॅन्ड ॲम्बॅसेडर नेमणे इत्यादी कार्यवाही प्रस्तावित असून पर्यटन क्षेत्र, श्री क्षेत्र व ऐतिहासिक मालमत्तांचे संवर्धन आणि विकासासाठी सन २०१६-१७ मधे ₹ २५ लक्ष इतकी तरतूद बांधकाम विभागांतर्गत आहे.

संपूर्ण शहरात आवश्यक त्या सर्व मार्गीकांवर परिवहन सेवा सुरु करण्याचा मानस आहे. सद्य:स्थितीत सुरु असलेल्या महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या  शालेय विद्यार्थी यांना ६६.६६%, जेष्ठ नागरिकांना ५०%, अंध व अपंग व्यक्तिंना सोबत्यासह प्रवास व प्रवास भाडयामध्ये ५०% सूट व इतर एकुण परिवहन सेवेच्या आवश्यक तरतुदी असलेला 'ब' अर्थसंकल्प स्वतंत्रपणे सादर केला असून त्यासाठी ₹ २७ कोटी ५७ लक्ष ३७ हजार महानगरपालिका अंशदानाची तरतुद 'अ' अर्थसंकल्पात आहे.

समाजातील सर्व घटकांच्या कल्याणासाठी योजनांचे स्वरुप व आवश्यकता विचारात घेऊन महिला व बाल कल्याण योजना तदतूदी, जेष्ठ नागरीकांच्या तरतूदी, युवक कल्याण कार्यक्रमाच्या तरतूदी, रुग्णालय व्यवस्थापनाच्या तरतूदी, अंध, अपंगांसाठीच्या तरतूदी, यामधून महिला व बाल कल्याण समितीमार्फत अनेक वैशिष्ठपूर्ण योजनांच्या

अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यांत आली असून त्याची आकडेवारी अर्थसंकल्पात समाविष्ट आहे.

जेष्ठ नागरीकांसाठी इतर विकास कामांच्या तरतूदी अंतर्गत स्कायवॉक तसेच उड्डाणपूलाजवळ सरकते जिने व उद्वाहन व्यवस्था, उद्यान व्यवस्थेच्या तरतूदी अंतर्गत नाना-नानी पार्क, सार्वजनिक व मोक्याचे ठिकाणी बैठक व्यवस्था, परिवहन सेवेत ५०% प्रवास भाडे सवलत, संस्था अनुदानांतर्गत जेष्ठ नागरीकांमार्फत चालविल्या जाणाऱ्या संस्थांना त्यांचे कार्यक्रमासाठी अनुदान, वृध्दाश्रमांना अनुदान, जेष्ठ नागरीकांच्या नोंदणीकृत संस्थांना अनुदान तसेच रुग्णालय व्यवस्थापनांतर्गत आरोग्य चिकित्सा व डायलेसीस उपचारांसाठीच्या तरतुदी अन्यत्र नमुदप्रमाणे असून विरंगुळा केंद्र व वृध्दाश्रमाचे व्यवस्थापनासाठी ₹ ५१ लक्ष इतकी स्वतंत्र तरतुद केली आहे. तसेच जेष्ठ नागरिकांमार्फत चालविल्या जाणाऱ्या नोंदणीकृत संस्थांना उद्यान देखभालीचा ठेका घेण्यासाठी प्राधान्य दिले जाणार आहे.

मच्छिमार बोटींसाठी जाळ्या, प्रथमोपचार पेटी (मेडिकल किट), लाईफ जॅकेट, पिण्याचे पाणी शुध्द राहणेसाठी रसायन मिश्रीत गोळ्या, सिग्नल लाईटसाठी बॅटरी व इतर आवश्यक साहित्य पुरविणे, मच्छिमारांना अपघाती विमा रकमेइतके थेट संरक्षणचा लाभ देणे, नैसर्गिक व इतर आपत्ती काळात नियंत्रण व मदतीसाठी संबंधित अभिकरणासमवेत करार करुन पोलीस मदतीसह हॅलिकॅप्टर भाडयाने घेणे इ. मच्छिमारांसाठी कल्याणकारी योजना राबविणे यासाठी रु. २ कोटी इतकी तरतुद केली आहे.

शेतकरी व बागायतदारांसाठी साहित्य पुरवठा, इत्यादी शेती विकास कार्यक्रमासाठी ₹ ५ कोटी विशेष तरतुद केली आहे.

नागरी गरीब घटकांसाठी स्वतंत्र वैद्यकीय शिबीर, अपघाती विमा संरक्षण, दलित वस्ती सुधारणा योजना, मच्छिमारांसाठीच्या योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, नागरी गरीब वस्तीतील विकास कामे शासकीय अनुदान निधीतून आदिवासी उपाययोजना वसतीगृह इ. बाबींसाठी "पी" बजेट अंतर्गत ₹ ५६ कोटी ६० लक्ष इतकी तरतूद केली आहे.

बालभवन संस्था, ग्रंथालये, जेष्ठ नागरीकांच्या विश्वस्त नोंदणीकृत संस्था तसेच शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या इतर विश्वस्त नोंदणीकृत संस्थांना अनुदान देणेकामी संस्था अनुदानाअंतर्गत ₹ २ कोटी २५ लक्ष इतकी तरतूद केली आहे.

महापौर सहायता निधीसाठी ₹ २५ लक्ष अनुदानाची तरतूद केली आहे.

असा हा ₹ १९३८ कोटी १३ लक्ष रकमेचा वैशिष्टयपूर्ण सर्वसमावेशक बहुजनांच्या प्रगतीचा, विकासाचा अर्थसंकल्प तयार करताना मा. महापौर, मा. उपमहापौर यांच मौलीक मार्गदर्शन तसेच मा. सभागृह नेते, मा. गटनेते, मा.स्थायी समिती सदस्य, सर्व प्रभाग समित्यांचे सन्मा. सभापती, मा. माजी परिवहन समिती सभापती, मा. महिला बाल कल्याण समिती सभापती व मा. आयुक्त यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याची मी जाणीवपूर्वक नोंद घेत आहे.

आपल्या कामातून " प्रगतीचा प्रकाश हाच बहुजन विकास " हे पालिकेचे ब्रीदवाक्य सार्थ होईल याची मला खात्री असून त्यासाठी आपण सदैव प्रयत्न करुया.

मा. स्थायी समितीने सादर केलेला हा अर्थसंकल्प मंजुर करणेस माझी आपणांस विनंती आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यवर पत्रकार, प्रसार माध्यमे व वसई -विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील तमाम जनतेने वेळोवेळी सहकार्य केले आहे. त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. मा. स्थायी समितीने मंजुर केलेला हा अर्थसंकल्प मी आपणासमोर सादर केला असून ही संधी लोकनेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. महापौर महोदया, मा. उपमहापौर साहेब, सर्व मा. पदाधिकारी व माझे मा. स्थायी समितीतील सर्व सहकारी तसेच माझ्या पक्षातील सर्व सन्मा. सदस्य व कार्यकर्ते यांनी दिली याबद्दल मी या सर्वांचा सदैव ऋणी राहीन.

धन्यवाद !

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

आपला,

(नितीन राऊत)<br>
सभापती<br>
स्थायी समिती<br>
वसई - विरार शहर महानगरपालिका